# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ८३२/२०२४**

**तक्रारकर्ता श्री. मोहम्मद अशरफ ए. करीम**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून**
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर,
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक**
मुंबई नगर भूमापन व भूमी अभिलेख (शहर) यांचे कार्यालय,
जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००01

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०३.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००२५२१ प्रकरणी आयोगाने दि.०८.०८.२०२४ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर इस्लाम जिमखान्याशी झालेल्या पत्रव्यवहाराची प्रत अपिलार्थी यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी, तसेच सदर विषय मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे निदर्शनास आणून १५ दिवसांत अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती इस्लाम जिमखाना यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थी यांना निशुल्क नोंदीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशाप्रमाणे माहिती मिळाली नाही, म्हणून अपिलार्थी यांनी दि. २६.१२.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. १२.०२.२०२५ रोजी अहवाल मागविला. जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०२.२०२५ रोजी आयोगास अहवाल सादर केला आहे.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांना माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दि. २५.०२.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, आयोगाचे आदेश दि. ०८.०८.२०२४ अन्वये जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर इस्लाम जिमखान्याशी झालेला पत्रव्यवहाराची प्रत अपिलाची यांना उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच सदर विषय मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे निदर्शनास आणून अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती इस्लाम जिमखाना यांचेकडून प्राप्त करून घेऊन अपिलार्थी यांना निःशुल्क

..२/-

उपलब्ध करून देणेबाबत आदेशीत करणेत आलेले आहे. सदरचे आदेश या कार्यालयास दि.०२.०९.२०२४ रोजी प्राप्त झालेले असून सदर आदेशानुषंगाने दि. १९.०९.२०२४ नुसार अपिलार्थी श्री. अशरफ कपाडीया यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर इस्लाम जिमखान्याशी झालेला पत्रव्यवहाराची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच, दि. १७.१०.२०२४ नुसार अध्यक्ष/सचिव, इस्लाम जिमखाना यांना जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीचे इतीवृत्त (सन २०१७ ते आजतागत) तात्काळ या कार्यालयास उपलब्ध करून देणेबाबत कळविणेत आलेले आहे. अध्यक्ष, इस्लाम जिमखाना यांचेकडील दि.२३.११.२०२४ रोजीच्या पत्रानुसार जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीचे इतीवृत्त सादर करणेच्या अनुषंगाने म्हणणे मांडण्याची संधी मिळणेबाबत जिमखान्याच्या विनंती करण्यात आली. तसेच, दि.३१.१२.२०२४ नुसार अपिलार्थी श्री. अशरफ कपाडीया यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सद्यस्थिती अवगत करून देण्यात आलेली आहे. तद्नंतर दि. ०९.०१.२०२५ नुसार अध्यक्ष/सचिव, इस्लाम जिमखाना यांना आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. १६.०१.२०२५ रोजी कार्यालयामध्ये उपस्थित राहणेबाबत कळविणेत आलेले होते. प्रकरणी दि. १६.०१.२०२५ रोजी वैयक्तीक कारणास्तव उपस्थित राहणे शक्य नसल्याने सदर बैठक अन्य दिवशी आयोजीत करणेबाबत इस्लाम जिमखान्याकडून विनंती करणेत आली. सदर विनंतीनुषंगाने दि. १७.०१.२०२५ नुसार अध्यक्ष/सचिव, इस्लाम जिमखाना यांना आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. २९.०१.२०२५ रोजी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आलेले होते. परंतू, सदर दिवशी इस्लाम जिमखान्याकडील प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यामुळे दि. २१.०२.२०२५ नुसार इस्लाम जिमखान्यास जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीचे इतीवृत्त (सन २०१७ ते आजतागत) सादर करणेबाबत वेळोवेळी निर्देष देवूनही सदर प्रकरणी कार्यवाही करणेबाबत जाणिवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याने इस्लाम जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीचे इतीवृत्त (सन २०१७ ते आजतागत) सादर करणेच्या अनुषंगाने अंतीम संधी म्हणून दि. २७.०२.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात समक्ष आवश्यक त्या माहितीसह सुनावणीस हजर राहणेबाबत कळविणेत आलेले आहे. तरी सदर माहिती इस्लाम जिमखानाकडून या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास उपलब्ध करून देण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असेही नमुद केले की, पुढील १० दिवसांत तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात येईल.

उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसते की, आयोगाच्या आदेशाचे अनुपालन झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश दि. ०८.०८.२०२४ चे अनुपालन करुन पुढील सुनावणीच्या वेळी अनुपालन अहवालासह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील <u>सुनावणी</u> दि. २३.०४.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २८.०३.२०२५**